खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – २८/०७/२०१७

प्रेसनोट

---

जेष्ठ महिलांना सोन्याचे बिस्किटाचे अमिष दाखवुन त्यांना बोलण्यात गुंतवुण ठेवुन त्यांचे अंगावरील खरे दागिने काढुन घेणारे दोन भामटे जेरबंद त्याचे कब्जातील दोन बनावट सोन्याचे बिस्किट व चैन हस्तगत

---

दिनांक २७/०७/२०१७ रोजी घटनेबाबत श्रीमती प्रमिला गोवर्धन गिरमे वय – ७८ रा – ४०४ सदाशिव पेठ पुणे यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी तक्रार दिलेली आहे त्या सकाळी साडेदहा वाजण्याच सुमारास कपडे खरेदी करण्यासाठी पायापायी मंडई, बाजीराव रोड पुणे येथुन जात असताना दुकान शोधत शोधत नातुबाग गणपती, बाजीराव रोड, पुणे या ठिकाणी आल्यावर त्यांना त्यांचे वॉचवर असलेले दोन अनोळखी इसम त्यांचा पाठलाग करीत असल्याचे जाणवले दोघेजण त्यांचेजवळ आले व त्यापैकी एकजण त्यांना म्हणाला की " त्या मुलाकडे दोन सोन्याची बिस्कीटे आहे, त्यापैकी एक बिस्कीट मी घेतो व दुसरे बिस्कीट तुम्ही घ्या व आपण त्या मुलाला पन्नास हजार रुपये देऊ " त्यावेळी फिर्यादी यांना संशय आल्याने त्यांनी त्या इसमास माझेकडे पन्नास हजार रुपये नसुन फक्त पाचशे रुपये आहेत असे सांगीतले. त्या इसमाने त्यांचेकडुन पाचशे रुपये घेतले व फिर्यादी यांचे अंगावरील सोन्याच्या पाटल्या व गळयातील सोन्याची चेन पाहुन त्यांना म्हणाला की " सोन्याची बिस्कीटे दहा तोळे वजनाची असुन, त्याचे बदली पाटल्या व सोन्याची चैन दया " सांगीतले. फिर्यादी यांना त्याचे वर्तनाबाबत संशय आल्याने त्यांनी अंगावरील सोन्याचे दागीने देण्यास नकार दिला . त्यावेळी दोघेजण तेथुन निघुन गेले सदर प्रकार घडत असताना तेथुन जाणारे नागरिक अमित भिकारदास पवार वय – ३८ रा – तळजाई पठार सर्वे नं ७ साईदत्त नगर धनकवडी गाव पुणे यांचे नजरेस आला होता घडलेल्या घटनेबाबत फिर्यादी यांनी पोलीसांना खबर दिली व संशयीत इसमांचे वर्णन दिल्यानंतर खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ संशयीत आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली त्यावेळी पोलीस कर्मचारी विनोद जाधव व रवि लोखंडे यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की संशयीत इसमासारखे वर्णन असलेले व कपडे घातलेले दोन इसम सराफ बाजारात फिरत आहेत त्यावरुन रविवार पेठ दर्ग्याजवळ संशयीत इसम दिलीप विश्वनाथ जाधव वय – ४८ रा - नांदेडनाका महादेवनगर, मशीदीचे शेजारी महंमदपुर लातुर व मनोज माणीक चव्हाण वय - १८ रा - इंदीरानगर झोपडपटटी पांडुभाऊ यांचे किराणामाल दुकानाजवळ महंमदपुर लातुर यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे त्यावेळी त्यांचेजवळ दोन हुबेहुब सोन्यासारखी दिसणारी बनावट दोन बिस्कीटे व एक साखळी व रोख रक्कम असा एकुण तीन हजार तीनशे चा माल मिळुन आला सदर जप्त करण्यात आलेले बनावट बिस्कीट सोन्याची चैनेबाबत त्यांचेकडे विचारणा करता त्या जेष्ठ महिलांची फसवणुक करण्यासाठी वापरत असल्याचे सांगितले आहे. संशयीत दिलीप विश्वनाथ जाधव हा मुळचा लातुर येथील आहे तो पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असुन त्याने यापुर्वीही अशाप्रकारे अनेक गुन्हे केलेले आहेत. त्यांनी अशाप्रकारे आणखी किती गुन्हे केले आहेत काय ? त्यांचे इतर साथीदार कोण आहेत ? बनावट दागिने कोठे तयार करतात ? याबाबत पोलीस तपास करत आहेत. अशाप्रकारे यापुर्वी ज्या जेष्ठ महिलांची फसवणुक झालेली आहे त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे फोन नंबर ०२०२४४५२०९५ अथवा ०२०२४४७६४२२ येथे संपर्क साधावा असे आवाहन पोलीसांनी केले आहे.

मा. श्रीमती अे. अेस. मुजुमदार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात सर्व आरोपींना हजर केले असता त्यांची न्यायालयाने पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड , आनंत व्यवहारे व पोलीस कर्मचारी बशीर सैय्यद , विनोद जाधव , रवि लोखंडे , अनिकेत बाबर यांनी पोलीस कर्मचारी केलेली आहे.